क्र.२०१०/मशाका-२/गौ.ख./रेती लिलाव/सीआर-३७
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक : ११.०३.२०११

# जाहीर प्रगटन

## नांदेड जिल्ह्यातील वाळू घाटांचा पाचव्या फेरीचा लिलाव सन २०१०-२०११

शासन निर्णय गौखनि १०/०२०८/प्र.क्र.३२/ख दिनांक **२५.१०.२०१०** मधील तरतुदी नुसार एकूण तीन फेरीचे लिलावा पर्यन्त लिलावात न गेलेल्या १८ वाळू घाटांची सरकारी किंमत २५% कमी करण्या बाबतचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना सादर करण्यात आला होता. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्रक क्र.२०१०-मशाका-२-गौ.ख.-कावि-३६९ दि. ४.२.२०११ अन्वये सदर १८ स्थळाची २५% सरकारी किंमत कमी करुन चौथ्या फेरीचा लिलाव घेण्यास मान्यता दिली. त्यानुसार दि. १७.२.२०११ रोजी सदर स्थळांचा लिलाव घेण्यात आला होता.

शासन निर्णय दि. २५.१०.२०१० मधील परिच्छेद ७(ड) (२) मधील तरतूदी प्रमाणे दोनदा फेर लिलाव लावूनही किंवा २५% अपसेट प्राईज कमी करुन फेर लिलाव न झाल्यास मा.आयुक्तांचे स्तरावर अशी कामे करण्यासाठीचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्रक दि. २२.२.२०११ अन्वये सादर करण्यात आला होता.

मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्रक जा.क्र. २०११-मशाका-२-गौ.ख.-कावि-६५६ दिनांक ४.३.२०११ अन्वये शासन निर्णय दि.२५.१०.२०१० परिच्छेद ७(ड)(३) व (४) प्रमाणे वाळू घाटांचा लिलाव न झाल्यास अर्हता प्राप्त करीत असलेल्या कंत्राटदारांना तसेच संबंधीत जिल्ह्याच्या आजूबाजूस कार्यरत असलेल्या कंत्राटदारांना एका ठराविक दिवशी, ठराविक वेळी व ठराविक ठिकाणी एकत्रीत बोलावून देकार देण्याची कार्यवाही या कार्यालयाचे स्तरावर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार सर्व अर्हता प्राप्त कंत्राटदारांना याव्दारे सूचीत करण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रातील (१८) वाळू घाटांचा पाचव्या फेरीचा लिलाव जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथील बचत भवन येथे दि. २२ मार्च २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येणार आहे. सदर लिलाव प्रक्रियेमध्ये जाहीर बोली व बंद निविदा या दोन्ही पध्दतीचा एकाच वेळी अवलंब करण्यात येणार आहे. लिलाव जाहीर बोलीची प्रकिया पूर्ण झाल्यानंतर त्याच ठिकाणी संबंधीत बंद निविदा उघडण्यात येतील. वाळू पट्टयाची उच्चतम बोली लिलाव व बंद निविदा या दोन्हीमध्ये जी रक्कम जास्त असेल त्यास लिलाव अंतीम करण्यात येईल.

सदरील रेती/वाळू घाटांचा तपशिल सोबतच्या विवरण पत्रा प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | लिलावाची तारीख | : | **२२ मार्च २०११ वेळ सकाळी ११.०० वा.** |
| २) | लिलाव स्थळ | : | जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड (बचतभवन) |
| ३) | निविदा किंमत | : | रुपये २०००/- प्रत्येक वाळू घाटासाठी वेगवेगळी (विना परतावा) |
| ४) | निविदा वाटपाचा व स्विकारण्याचा कालावधी व ठिकाण | : | दिनांक १५/०३/२०११ ते २१/०३/२०११ पर्यन्त (कार्यालयीन वेळेत, सुटीचे दिवस वगळून) गौण खनिज शाखा (जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे ) |

५) ज्या कंत्राटदारांना लिलावात बोली बोलावयाची आहे त्यांनी स्वत: सदरील तारखेस व वेळेवर उपस्थित राहून लिलावात भाग घ्यावा.

६) लिलावात भाग घेउ इच्छिणाऱ्या व निविदा भरु इच्छिणाऱ्या प्रत्येक कंत्राटदाराकडे आयकर विभागाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक असून मागील वर्षी दाखल केलेल्या रिटर्नसची प्रत दाखल करावी लागेल तसेच विक्रीकर विभागाकडील टीन (TIN)प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. ज्यांच्याकडे पॅनकार्ड व टीन (TIN) प्रमाणपत्र नसेल अशांना लिलावात भाग घेता येणार नाही.

७) लिलाव स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे तसेच लिलावाचे जाहीर प्रगटनामध्ये कोणताही बदल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

८) विस्तृत स्वरुपात सदरील अटी व शर्ती ह्या गौण खनिज विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड, उपविभागीय अधिकारी कार्यालय नांदेड / भोकर / किनवट / देगलूर तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध राहतील.

जिल्हाधिकारी, नांदेड

# वि व र ण प त्र

## सन २०१०-२०११ मध्ये होणा-या लिलाव वाळू घाटांचा तपशील (पाचवी फेरी)

| अ. क्र. | तालुका | रेती स्थळाचे नांव | नदी/ नाल्या चे नांव | वाळु घाटास लागून येत असलेले गट क्रं./स.नं. | लिलावा साठी उपलब्ध अंदाजे रेती साठा (ब्रास मध्ये) | सरकारी किंमत | निश्चित करुन दिलेल्या अपसेट प्राईस पेक्षा २५% कमी करुन येणारी किमत व लिलावासाठी अंतिम निश्चित करावयाची किंमत | बोली/लिलाव निविदेत भाग घेण्यासाठी आवश्यक अनामत रक्कम (रोख रक्कम) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | नांदेड | १)राहेगांव | गोदावरी | २,३,४,५,३३,३६ व ३७ लगत | ११००० | २८,७५,००० | २१,५६,२५० | ६४,६८८ | |
| २ | मुदखेड | २) आमदूरा | गोदावरी | ३७७,३७८,३७६,३७५ ,३७४,३७३,३७२ लगत | ५३०० | १८,९८,००० | १४,२३,१२५ | ४२,६९४ | |
| ३ | देगलूर | ३) हावरगा | लेन्डी | १७१,१६८,१६७,१३,१४ ,१ व २ लगत | २८६० | ६,५६,००० | ४,९१,६२५ | १४,७४९ | |
| | | ४) सुंडगी | लेन्डी | २३९,२४०,१७९,१७४, १७५,१७२ लगत | १२२० | ४,६०,००० | ३,४५,००० | १०३५० | |
| | | ५)शेवाळा | मांजरा | ९०,३५७,३५६, व ३५८ लगत | ३५८०० | ७३,७०,००० | ५५,२७,५०० | १,६५,८२५ | |
| | | ६) शेकापूर | मांजरा | २२,३२,३३,३७,३८,३९ लगत | २६५०० | ६३,२५००० | ४७,४३,७५० | १,४२,३१३ | |
| | | ७)सांगवी उमर | लेन्डी | १४१,१४३,१३ व ३३ लगत | ७४५० | १,०२,८१,००० | ७७,१०,७५० | २,३१,३२३ | |
| | | ८)तमलूर | मांजरा | २५८,२५९,२६०,२६३, २६४ लगत | १८४०० | ३७,९०,००० | २८,४२,५०० | ८५,२७५ | |
| ४ | बिलोली | ९) येसगी | मांजरा | २३३,२५१,२४३,२५२, २५४,२३५,२४१ लगत | १५९०० | १,५०,६५,००० | १,१२,९८,७५० | ३,३८,९६३ | |
| | | १०) बोळेगांव | मांजरा | ३२०,२८९ | १२२०० | १,५५,२५,००० | १,१६,४३,७५० | ३,४९,३१३ | |
| ५ | लोहा | ११) अंतेश्वर | गोदावरी | १८८,१८९,१९०,१९५, १९६,१९७ लगत | ४२४० | ८८,७८,००० | ६६,५८,१२५ | १,९९,७४४ | |
| ६ | हदगांव | १२) भानेगांव | कयाधू | ७ | ५३० | १०,९२,००० | ८,१९,००० | २४,५७० | |
| | | १३) गुरफळी | पैनगंगा | ६,७,११,१३,१४,१५,१६ ,२६,२७,२८,२९,३०,३ १,३२,३३ लगत | ३९७५ | १४,९५,००० | ११,२१,२५० | ३३,६३८ | |
| ७ | हिमायत नगर | १४) पळसापूर | पैनगंगा | २९,३०,३१,३२ व ३३ लगत | १५९० | ६,४०,००० | ४,७९,९८२ | १४,४०० | |
| | | १५) रेणापूर(बे) | पैनगंगा | ८०,८१ | १२४० | २,५६,००० | १,९१,६२५ | १०,००० | |
| ८ | मुखेड | १६) मुक्रमाबाद | लेन्डी | ९७,१०१,११८,११९,१२१ ,१३२,१३३ लगत | १७९० | ३,६९,००० | २,७६,५६३ | १०,००० | |
| ९ | माहूर | १७) नेर | पैनगंगा | ७ व ८ लगत | ३९७५ | २०,५१,००० | १५,३७,८९२ | ४६१३७ | |
| | | १८) टाकळी | पैनगंगा | ८३,८४,८५,८६,८७, ७,८,९ लगत | ४२०० | २०,७७,००० | १५,५७,६७५ | ४६,७३० | |

जिल्हाधिकारी, नांदेड